किंमत - वार्षिक वर्गणी २००/- रुपये

# अर्थबोधपत्रिका

## मोजक्या वेळेत जगाबद्दलची जाण वाढविणारे उद्‌बोधक व माहितीपूर्ण मासिक


३● टप्पा

५● सैरभैरता वैश्विक तरुणाईची...

११● सेतू रबराचा...

२१● साखरेची सुट्टी !

२५● जिकडेतिकडे



**खंड १५ : अंक ३** **जून २०१६**

**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी**



वार्षिक वर्गणी २००/- रुपये (परदेशस्थ वाचकांसाठी $ २०) वर्गणी डिमांड ड्राफ्ट/ मनीऑर्डर/चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'** या नावे पाठवावी. त्याबरोबर **नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.**

**'अर्थबोधपत्रिका'** दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाने पाठविली जाते.



वर्गणीसाठी पत्ता : व्यवस्थापक,

**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,** अर्थबोध,

९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग,

(रत्ना हॉस्पिटलजवळ) पुणे ४११ ०१६.

फोन : २५६५७१३२, २५६५७२१०,

२५६५७६९७

ई-मेलः- ispe@vsnl.net

website- www.ispepune.org.in



**अर्थबोधपत्रिका**

**खंड १५ (अंक ३) जून २०१६**

**संपादक - अभय टिळक**

**निर्मिती-सहभाग - गिरिजा देशमुख**


*अर्थबोधपत्रिकेतील माहिती कशी?*

- उद्‌बोधक, वाचनीय आणि रंजक
- अभ्यासपूर्ण आणि विश्लेषक
- निःपक्ष व साधार
- सोप्या भाषेतील आणि विचारप्रवर्तक

### अर्थबोधपत्रिकेचा हेतू

**प्रतिष्ठित व अग्रगण्य नियत-कालिके, पुस्तके आणि इंटरनेटसारख्या माध्यमांद्वारे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर, मुख्यतः इंग्रजी भाषेत प्रकाशित होणारी जी माहिती मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी वेचक माहिती संदर्भासह पुरविणे.**

*अर्थबोधपत्रिका कशी साकारते?*

- मूळ इंग्रजी संदर्भाचा शोध व वाचन
- निवडक साहित्याचे संकलन
- संकलित साहित्याला अन्य पूरक माहितीची जोड
- संकलित माहितीच्या आधारे नव्याने लेखन. मूळ इंग्रजी संदर्भाचा केवळ अनुवाद नव्हे.

◆या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावेत, ही विनंती.


◆अंकातील लेख आपण नियतकालिकात/वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. मात्र, लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने'** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे.**यासाठी संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.**

**जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**

# टप्पा

बघता बघता २०१६ हे वर्ष निम्मे सरायला आले. जून महिना तोंडावर यायच्या किती तरी आधीपासून आपल्या सगळ्यांनाच पावसाचे वेध लागलेले आहेत. आणि ते साहजिकच आहे व होते. कारण, गेले दोन पावसाळे पावसाने त्याची ओंजळ चांगल्यापैकी आखडती घेतल्याने आपल्या सगळ्यांच्याच तोंडचे पाणी पळवले होते. यंदा मात्र पर्जन्यराजा आपली निराशा करणार नाही, अशीच प्रार्थना सगळेजण करत आहेत. या दोन वर्षांच्या अनियमित वृष्टीपायी दुष्काळ, पाणीटंचाई, पाण्याचे संगोपन या संदर्भातील सगळीच चर्चा एका विशिष्ट टप्प्यावर येऊन स्थिरावते आहे, हे मात्र नक्की. पाणीवापराची एक आमूलाग्र नवी, बदलत्या पर्यावरणाशी ससंगत अशी संस्कृती आपल्या सगळ्यांनाच आपल्या अंगी बाणवून घ्यावी लागणार आहे, ही जाणीव समाजाच्या काही स्तरांत तरी आताशा चांगल्यापैकी रुजते आहे. या संस्कृतीचा फैलाव सर्वदूर येत्या काळात किती सखोल होतो, त्यांवर खूप काही अवलंबून राहील. दुसरे म्हणजे, सगळ्यांच बाबतीत सरकार अथवा शासनसंस्थेवर अवलंबून राहून या पुढे भागणारे नाही, ही खूणगाठही आपल्या सगळ्यांनाच मनोमन बांधणे गरजेचे आहे. यांत तुलनेने मोठी जबाबदारी निभवावी लागेल ती आपल्या राजकीय व्यवहारात सक्रिय असणा-या राजकीय पक्षांना. सरकार काय अथवा शासनसंस्था काय सगळ्यांच गोष्टी सवलतीने अथवा फुकट देऊ शकणार नाही, हे वास्तव आपल्या मतदारांपुढे सगळ्यांच राजकीय पक्षांनी स्पष्टपणे मांडणे गरजेचे ठरत जाणार आहे. कारण, अगदी शासन जरी झाले तरी पैशाचे सोंग कोणालाही आणता येत नाही. सरकार शेवटी झुकते आणि तिजोरीतील तूट वाढण्याचा धोका पत्करूनही आपल्या फुकटेगिरीसाठी कटिबद्ध बनते, हेही आपल्याला चांगल्यापैकी ठाऊक झालेले असल्याने सदासर्वकाळ समाजातील कोणता ना कोणता घटक सतत काही ना काही सवलतीने अथवा चकटफू मागण्यासाठीच ओरडा करत असतो. आज एकंदरच जागतिक अर्थव्यवस्था ज्या टप्प्यावर येऊन ठेपलेली आहे त्या टप्प्यावर आपल्या अंगी बाणलेल्या काही अनिष्ट सवयींना सोडचिठ्ठी



ही द्यावीच लागेल. 'पब्लिक-प्रायव्हेट पार्टनरशिप' या संकल्पनेचा एक अर्थ हाही आहे. सगळ्यांचे लाड शासनसंस्थेला अनंत काळ पुरवता येत नाहीत, हा साक्षात्कार सामाजिक सुरक्षेचे अत्यंत भक्कम असे बहुपदरी कवच पिढ्यान्‌पिढ्या अंगावर मिरवणा-या पश्चिमी राष्ट्रांतील समाजसमूहांना आताशा प्रकर्षाने होतो आहे. जगाच्या लोकसंख्येची वयानुसारी जडणघडण गुणात्मकरीत्या बदलते आहे, हे त्यांमागील एक मुख्य कारण. एक भारत सोडता, 'डेमोग्राफिक डिव्हिडंड'चा बोनस आज जगातील अन्य एकाही राष्ट्रापाशी नाही. तरूणांचे एकंदर लोकसंख्येमध्ये असणारे प्रमाण क्रमाने आक्रसत जाण्याचा धोका आज उभ्या युरोपपासून ते अमेरिका-चीन-जपान अशा विविध देशांच्या पुढ्यात उभा आहे. भारताच्याबाबतीत समस्या आहे ती वेगळीच. एवढ्या प्रचंड संख्येने असणा-या तरुणाईच्या ठायी वसणा-या सर्जनशीलतेचा उत्पादक वापर कसा करून घ्यावयाचा हा आपली झोप उडवणारा प्रश्न होय. *(कृपया पृष्ठ २७ पाहावे)*

## वाचकांना विनंती

'अर्थबोधपत्रिके'चा अंक दर महिन्याच्या १०तारखेला पोस्टाद्वारे पाठविला जातो. २५ तारखेपर्यंत अंक न मिळाल्यास प्रथम आपल्या पोस्टात चौकशी करावी व नंतरच आमच्याकडे लेखी तक्रार करावी. अंक शिल्लक असल्यास पुढील महिन्याच्या अंकाबरोबर पाठविला जाईल.

**माहितीसाठी - 'अर्थबोधपत्रिके'चे मागील अंक संस्थेच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. त्यासाठी www.ispepune.org.in इथे वाचकांनी अवश्य भेट द्यावी.**

## निवेदन

- ज्या देश, प्रदेश, संस्था अथवा व्यक्तिनामांच्या इंग्रजी स्पेलिंगनुसारी अचुक मराठी उच्चारांसंदर्भात संदिग्धता जाणवते अशी नामे लेखांमध्ये देवनागरीत उद्‌धृत करण्याऐवजी रोमन लिपीमध्ये इंग्रजीतच दिलेली आहेत.
- लेखांमधील संदर्भांसाठी विश्वसनीय, अधिकृत अशा वेबसाइट्सच धुंडाळण्याचा कटाक्ष ठेवला जातो. तरीही, इंटरनेटवरून घेतलेल्या तपशीलाच्या यथार्थतेबाबत भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी हमी देऊ शकणार नाही. अशा मजकुराची जबाबदारीही संस्थेवर नाही, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

सामाजिक

# सैरभैरता वैश्विक तरुणाईची...

ऐन तारुण्य हा कोणत्याही मनुष्याच्या जीवनातील सर्वांत सुंदर काळ गणला जातो. भविष्याबद्दलची अनंत स्वप्ने असतात त्या वयात प्रत्येक व्यक्तीच्या डोळ्यांपुढे. केवळ स्वप्नेच नव्हे तर, ती स्वप्ने वास्तवात उतरविण्याची हिंमत असते उरात आणि ताकद असते मनगटांत. रोमरोमांत रग ठासून भरलेली असते. स्वकतृत्त्वाने दशदिशा दिपवून टाकण्याची ईर्षा मनीमानसी फुरफुरत असते. अर्थात, सगळ्यांच्याच इच्छा-आकांक्षा व्यवहारात फलद्रुप होतात असे नाही. स्वप्नांना वास्तवात आकार लाभण्यासाठी काही किमान भौतिक अनुकूलताही गरजेची असते. संधी मिळणे जितके गरजेचे असते तितकीच साथही लागते पूरक व्यावहारिक पर्यावरणाची. अन्यथा, महत्त्वाकांक्षेचे अंकूर धुमारण्याआधीच ठायीच्या ठायी कोळपून जातात. व्यापक स्तरावरील आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमांचे ऐलान जगाच्या पाठीवरील निरनिराळ्या देशांत साधारणतः १९८०च्या दशकाच्या आगेमागे केले जाऊ लागले. पुनर्रचनेच्या पर्वादरम्यान या जगातला पहिला श्वास घेती झालेली पिढी आज पंचविशीचा टप्पा ओलांडून तिशीमध्ये प्रवेश करते आहे. २००८ साली उद्भवलेल्या आर्थिक अरिष्टामुळे जगभरातीलच वित्तीय तसेच व्यावसायिक वातावरण सध्या पार बदललेले आहे. उदारीकरणानंतर जन्माला आलेल्या पिढ्या आजमितीस आशा आणि चिंतांचा लपंडाव चालू असलेल्या आर्थिक पर्यावरणात स्वतःचा अवकाश शोधू पाहत आहेत. हे सगळेच वास्तव सद्यःस्थितीत कमालीचे अस्थिर व अनिश्चित बनलेले आहे. अलीकडच्या काळातील हे स्थित्यंतर मुख्यतः वित्तीय वा आर्थिक असले तरी त्याचे कवडसे मानवी जीवनाच्या सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक अंगांतही उमटत आहेत. अशा सगळ्या गतिमानीपायी आजमितीस सैरभैर असलेल्या वैश्विक तरुणाईच्या पुढ्यातील आव्हानांचा आलेख रेखाटण्याचा एक प्रयत्न या ठिकाणी केलेला आहे. जगभरातील तरुणाईच्या अंतरंगात घुमत असलेल्या वावटळीची काहीशी अटकळ त्यांद्वारे बांधता यावी.



वयाच्या परिभाषेत बोलायचे तर वय वर्षे १५ ते वय वर्षे ३० या वयोगटातील तरुणांची संख्या आज जगात जवळपास १५० कोटींच्या घरात भरते. जगाच्या एकंदर लोकसंख्येशी या लोकसंख्येचे प्रमाण मोजू गेले तर ते साधारणतः एक चतुर्थांशाच्या आसपास बसते. या तरुणाईचे भौगोलिक स्थानांकन बघू जाता ते चांगल्यापैकी विषम दिसते. एकूणांतील जवळपास ८५ टक्के तरूण आज जगाच्या विकसनशील पट्ट्यात एकवटलेले आहेत. केवळ भौतिक वा सांपत्तिक स्थितीतच नव्हे तर, भावनिक, सांस्कृतिक बाबतींतही या जागतिक तरुणाईमध्ये उदंड वैविध्य व तफावत आहे, हे वेगळे सांगायची खरे पाहता गरज नाही. परंतु, देशवेष काहीही असला तरी, जगभरात विखुरलेल्या या तरुणाईच्या पुढ्यात आज ठाकलेल्या काही समस्या सर्वत्रच ब-यापैकी समान दिसतात. चांगले दर्जेदार शिक्षण, अंगातील सर्जनशील कर्तबगारीला पुरेसा वाव देणारा रोजगार, राहण्यासाठी सुबक निवारा आणि कोणत्याही सुखदुःखात पाठराखण करील असा जीवनसाथी... याच या वैश्विक तरुणाईच्या जीवनाकडून अपेक्षा आहेत. आणि, नेमक्या याच आघाड्यांवर आज सर्वत्रच उदंड अनिश्चितता व अस्थिरता पुढ्यात उभरते आहे. या ढोबळ चित्राचे सूक्ष्म कंगोरे न्याहाळले की हे वास्तव प्रत्यक्षात किती गुंतागुंतीचे आणि म्हणूनच भयासूर आहे, ते ध्यानात येते.

आजच्या जगातील मध्यम उत्पन्नगटात मोडणा-या देशांतील विद्यमान तरुणाईचे चित्र पाहू गेले तर असे ध्यानात येते की, शिक्षण, प्रशिक्षण अथवा रोजगार या तीनपैकी कोठेही नसलेल्या तरुणांचे प्रमाण एकूणांत २५ टक्के इतके भरते. या गटाला 'नीट्स्' (नो एज्युकेशन-नो एम्प्लॉयमेन्ट-नो ट्रेनिंग) अशा इंग्रजी लघुरूपाने निर्देशित करण्यात येते. म्हणजे, थोडक्यात, हे तरूण काहीच करत नाहीत. जगातील श्रीमंत गणल्या जाणा-या देशांत अशा तरुणांचे एकूणांतील प्रमाण भरते जवळपास १५ टक्के इतके. दुसरीकडे, उभ्या जगातील श्रमांची बाजारपेठ दिवसेंदिवस अधिकाधिक स्पर्धात्मक बनत चाललेली आहे. हे पुरेसे नव्हते म्हणून की काय, जगभरातील बहुतेक देशांमधील कामगारविषयक कायदे हे विद्यमान कामगारांच्या हिताचेच रक्षण करणारे दिसतात.

म्हणजे, श्रमदलात नव्याने दाखल होऊ पाहणारी तरुणाई आजमितीस एका मोठ्या विचित्र खोड्यात अडकत चाललेली आहे. चांगली नोकरी पदरात पाडून घ्यावयाची तर उच्च दर्जाचे गुणवंत शिक्षण हवे. त्याच वेळी उच्च शिक्षण जगात सगळीकडेच महागडे होत चाललेले आहे. नोकरी मिळाल्यानंतर राहण्यासाठी घर हवे. निवासी घरांची बाजारपेठ तर कमालीची विकृत झालेली आहे. निवासी घरांच्या किमती काहीच्याबाही वाढत-चढत आहेत. मोठ्या आणि महानगरांच्या जागतिक साखळीत समावेश असलेल्या शहरांतील जमिनीच्या आणि निवासी गाळ्यांच्या बाजारपेठा तर सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेरच जात आहेत. त्याच वेळी चांगल्या, दर्जेदार, उच्च उत्पन्न मिळवून देणा-या नोक-या सापडतात त्या नेमक्या अशाच मोठ्या नगरा-महानगरांत. त्यांमुळे, होतकरू तरुणांचे पाय वळत आहेत मोठ्या शहरांकडेच. त्यांतून एकीकडे शहरीकरणाचा तोल पुरता ढासळतो आहे तर दुसरीकडे देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय स्थलांतराच्या वाढत्या रेट्यापायी ठिकठिकाणचे मुळातील आर्थिक-सामाजिक-सांस्कृतिक प्रश्न व समस्या अधिकच जटिल बनत चाललेल्या आहेत. मुदलात, बाहेरील देशांमधून येणा-यांना आपापल्या सीमा बंद करण्याकडेच आताशा अनेक देशांचा कल वाढतो आहे.

ना शिक्षण, ना रोजगार, ना निवारा असा सर्वत्रच नन्नाचा पाढा पढणा-या तरुणाईपायी अनेक देशांतील, खास करून पाश्चिमात्य युरोपीय देशांतील सार्वजनिक वित्तव्यवहारांची रया झपाट्याने उतरणीला लागते आहे. वैद्यकशास्त्रातील अप्रतिहत प्रगतीपायी आणि एकंदरीनेच जीवनमान व जगण्याचा आर्थिक स्तर उंचावल्याने जगभर सर्वत्र आयुर्मान सरासरीने वाढलेले आहे. त्यांमुळे, त्या त्या देशातील ज्येष्ठ नागरिकांच्या निर्वाह व देखभालीचे उत्तरदायित्त्व त्या त्या समाजातील तरुणाईच्या खांद्यावर विसावते आहे. मुळात, शिक्षण, नोकरी, घर व संसार या आघाड्यांवरच नीट बस्तान बसत नसलेल्या तरुणाईने हा आर्थिक भार पेलायचा कसा, असा मोठा बांका प्रश्न आज अनेक देशांत तीव्र बनतो आहे. बेरोजगारीचे प्रमाण मोठे असल्याने शासनसंस्थेलाही करांच्या माध्यमातून अपेक्षित महसूल मिळत नसल्याने तिचा आर्थिक डोलाराही खचू पाहतो आहे.



या सगळ्या प्रक्रियेचे राजकीय परिमाण जाणून घेणेही मोठे रोचक व मनोज्ञ ठरावे. सार्वजनिक खर्चाच्याबाबतीत जगातील श्रीमंत देश तरुणांच्यापेक्षाही त्या त्या समाजातील वयोवृद्ध व ज्येष्ठ नागरिकांच्या गरजांकडे अधिक सजगतेने व संवेदनशीलतेने बघत असल्याचे चित्र प्रकर्षाने दिसते. आपापल्या देशातील तरुणाईसाठी चांगल्या दर्जेदार व रोजगारसन्मुख शिक्षण-प्रशिक्षणाच्या सोयीसुविधांची निर्मिती पुरेशा प्रमाणावर करण्याऐवजी, शासनसंस्था व सरकारपदस्थ समाजातील ज्येष्ठ नागरिकांची निवृत्तिवेतने व आरोग्यविषयक देखभालीसाठी अर्थसंकल्पांत तुलनेने घसघशीत तरतूद करताना दिसतात. समाजव्यवस्थेतील आधीच्या पिढ्या त्या त्या समाजातील नवीन, तरूण पिढीसाठी वित्तीय तरतूद करून ठेवतात अथवा ठेवत असत, असाच जगभरातील आजवरचा कल राहिलेला आहे. परंतु, हा कल अलीकडील काही वर्षांत मात्र पालटताना दिसतो. लोकशाही राज्यव्यवस्था नांदणा-या देशांतील राजकीय नेतृत्त्वही आपापल्या मतदात्यांचे हितसंबंध वर्धिष्णू राखण्यावर आवर्जून लक्ष एकवटतात. एकंदरीनेच, देशोदेशींचे वयोवृद्ध मतदानात तुलनेने आघाडीवर असतात, असे एक सार्वत्रिक चित्र आहे. मतदानाबाबत तरुणाईच्या तुलनेत प्रौढ व ज्येष्ठ नागरिक अधिक उत्साही व जागरूकही राहतात. अमेरिकेमध्ये २०१४ साली झालेल्या एका मध्यावधी निवडणुकीमध्ये, वय वर्षे १८ ते २४ या वयोगटातील एकंदर अमेरिकी मुलांपैकी केवळ २३ टक्के तरुणांनीच काय ते मतदानात स्वारस्य दाखवलेले होते. तर, वयाची पासष्टी उलटून गेलेल्या ज्येष्ठ नागरिकांमध्ये मतदानाचे हेच सरासरी प्रमाण होते चांगले ५९ टक्के इतके. २०१५ साली ब्रिटनमध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकांत, वय वर्षे १८ ते २४ या वयोगटातील तरुणांपैकी केवळ ४३ टक्के तरुणांनीच काय तो मतदानाचा हक्क बजावला. तर तिथेही वयाची ६५ वर्षे उलटून गेलेल्या ज्येष्ठ नागरिकांपैकी जवळपास ७८ टक्के नागरिकांनी हिरिरीने मतदान केले. साहजिकच, ज्येष्ठ नागरिकांनी ज्या राजकीय पक्षांची तळी निवडणुकांदरम्यान उचलून धरली त्याच पक्षांना निवडणुकीच्या राजकारणात भरघोस यश मिळाले. परिणामी, राजकीय प्रक्रियेबाबत आजच्या तरुणाईला आस्था असली तरी राजकीय पक्षांबाबत मात्र तिला जवळीक वाटत नाही.

**अडथळ्यांची शर्यतच जणू !**

जागतिक अर्थव्यवस्थेमध्ये २००८ साली उद्‌भवलेल्या वित्तीय अरिष्टानंतर रोजगार-बेरोजगारीचे चित्र पार पालटून गेलेले आहे. श्रमदलात नव्यानेच प्रवेश करू पाहणा-या तरूण उमेदवारांची परिस्थिती सर्वत्रच मोठी अवघड बनते चाललेली दिसते. फ्रान्ससारख्या युरोपीय देशाचे उदाहरण या संदर्भात विशेष मननीय ठरावे. एकंदरीनेच, ज्यांना रोजगार वा नोकरी पूर्वीच मिळून आज जे प्रस्थापित व सुरक्षित जीवन जगत आहेत, अशा कामगारांची सध्या सगळीकडे चांदी आहे. कारण, देशोदेशीचे कामगार कायदे कामगारांच्या नेमक्या याच उपगटाची तळी उचलून धरणारे असे आहेत. फ्रान्सही याला अपवाद नाही. विद्यमान कामगारांच्या हिताचे संरक्षण-संवर्धन करण्यावरच फ्रान्समधील कामगारविषयक कायद्यांचा मुख्य भर एकवटलेला आहे. कोणताही कामगार एकदा का नोकरीच्या ठिकाणी कायम झाला की त्याला कोणत्याही कारणास्तव कामावरून काढणे हे महाकर्मकठीण. याचा एक अत्यंत स्वाभाविक आणि आनुषंगिक परिणाम म्हणजे, फ्रान्समधील उद्योगव्यवसाय नव्याने कामगार नेमण्याबाबत आज कमालीचे अनुत्सुक वा नाखूष बनलेले आहेत. नवीन रोजगारभरती आज तिथे जवळपास ठप्पच आहे. जी काही भरती नव्याने जिथे कोठे होते त्यांपैकी जवळपास चार पंचमांश कामगार हे अल्प मुदतीच्या कंत्राटी तत्त्वांवर नेमले जातात.

वय वर्षे १५ ते वय वर्षे २४ या वयोगटातील व्यक्ती जागतिक श्रम संघटनेच्या व्याख्येनुसार 'तरूण' गणली जाते. या व्याख्येनुसार, फ्रान्समधील एकूण तरुणांपैकी आजमितीस जवळपास २५ टक्के तरूण बेरोजगार असल्याचे आढळून येते. बरोजगारीची ही फ्रेंच समस्या आजची नाही. गेली सुमारे तीन दशके या समस्येचे स्वरूप असे व इतकेच तीव्र राहिलेले आहे. या समस्येवर तोडगा शोधण्यासाठी अत्यंत गरजेच्या असणा-या मूलभूत स्वरूपाच्या कामगार सुधारणा व्यवहारात राबविण्यास तेथील मतदार कौल देत नाहीत. परिणामी, श्रमदलात नव्याने सामील होऊ पाहणा-या रोजगारेच्छू तरुणांची तिथे प्रचंड कोंडी होताना दिसते. नोकरी मिळवणे ही एक मोठी अडथळ्यांची शर्यतच होऊन बसलेली आहे.



कमालीचे कठोर, थिजलेले, घट्ट, संकुचित आणि बथ्थड असे कामगारविषयक कायदे युरोपातील अनेक देशांमधील तरुणाईचा रोजगाराचा मार्ग अवरुद्ध बनवत आहेत. नोकरी मिळवण्यासाठी विचारणा करणा-या तरुणांना पूर्वानुभव विचारला जातो. मुळात, हाताला रोजगार मिळालाच नाही तर कोणत्याही प्रकारचा कार्यानुभव कोणाच्याही गाठीशी कसा तयार व्हावा ? मग, याच दुष्टचक्रात वा कोंडीत अनंत तरूण पिळवटून जाताना दिसतात. इथेही पुन्हा मुद्दा येतो तो कामगार कायद्यांचाच. जुन्या कामगारांना कोणत्याही कारणास्तव कामावरून कमी करणे हे दुरापास्त असल्यामुळे नवीन कोणालाही कामावर घेण्यास व्यावसायिक कमालीचे अनुत्सुक राहतात. मग रोजगाराच्या शोधात असलेल्या तरुणांना कामच मिळत नाही. काम नाही म्हणून कार्यानुभव नाही आणि कार्यानुभव नाही म्हणून रोजगार अथवा नोकरी नाही, या चक्रातून बाहेर पडणे दुष्कर बनून राहते. त्यांतच, सध्या सगळीकडेच मंदीपायी निराशा दाटलेली आहे. अर्थात, या बाबतीत केवळ फ्रान्स हा एकच देश डोळ्यांसमोर येतो असे अजिबात नाही. ग्रीस, स्पेन, इटली या युरोपीय समुदायातील अन्य देशांमधील चित्र मुळीच निराळे नाही. या देशांतील प्रचलीत कामगार कायदेही श्रमदलात नव्यानेच दाखल होणा-या तरुणाईची नाकेबंदी करणारे असेच आहेत. या तीन देशांतील तरुणाईमधील (म्हणजे, वय वर्षे १५ ते वय वर्षे २४ या वयोगटातील व्यक्ती) अनुक्रमे ४८ टक्के, ४८ टक्के आणि ४० टक्के इतके लक्षणीय मोठे आहे.

या संदर्भात विकसनशील देशांमधील आजचे चित्रही यांपेक्षा फारसे निराळे अथवा सरस वगैरे अजिबात नाही. ब्राझीलमधील एकंदर तरूणाईपैकी १६ टक्के तरूण आज रोजगाराच्या शोधात दिसतात. तर, दक्षिण आफ्रिकेसारख्या देशात हेच प्रमाण दिसते तब्बल ६३ टक्के इतके मोठे. जागतिक स्तरावर बघितले तरी बेरोजगारीचे तरुणांमधील सरासरी प्रमाण हे प्रौढांमधील सरासरी प्रमाणापेक्षा किती तरी अधिक असल्याचे चित्र आपल्याला आढळून येते. जागतिक स्तरावर तरुणांमधील बेरोजगारीचे सरासरी प्रमाण भरते १३ टक्के असे; तर, प्रौढांमध्ये तेच प्रमाण दिसते अवघे ४.५ टक्के इतके. ***(कृपया पृष्ठ १७ वर पाहावे)***

भूगोल

# सेतू रबराचा...

वेगाने चौफेर घडून येत असलेले शहरीकरण, पृथ्वीच्या पृष्ठभागाच्या तापमानामध्ये सरासरीने वाढ घडून येण्याची जागतिक स्तरावरील प्रक्रिया, निसर्गाचा सतत चालू असलेला -हास, प्रदूषणाचा दिवसेंदिवस घट्ट आवळत जात असलेला विळखा... अशांसारख्या सध्याच्या काही गंभीर समस्यांच्या चपेट्यात आपण सगळे आजघडीला गुरफटत जातो आहोत. एकीकडे हे सगळे असे घडत असतानाच, कधी कधी माणूस या निसर्गाला वेठीला धरण्याऐवजी नैसर्गिक साधनसुविधांनाच हाताशी धरून आपल्या जीवनाचा स्तर उंचावताना दिसतो, तेव्हा आजूबाजूच्या वैफल्याग्रस्त वातावरणात आशेचा एक नवा किरणच जणू गवसल्यासारखे वाटते. निसर्ग आणि मानवसमाज यांच्यादरम्यान एक आगळेवेगळे आणि परस्परपोषक व परस्परपूरक असे नाते साकारणारी काही उदाहरणे अभ्यासणे, त्यांमुळेच, अधिकच उद्बोधक ठरते.

मेघालय हे भारताच्या ईशान्येकडचे एक छोटेसे राज्य. भारतात राहूनही या राज्याला भेट देण्याचा प्रसंग फार कमी जणांच्या आयुष्यात येतो. गेल्या काही वर्षांत मात्र पर्यटनाची व्याख्या बदलल्यामुळे या तुलनेने अ-लक्षित अशा राज्याला भेट देणा-यांची संख्या वाढते आहे. ईशान्येकडील या राज्यांना स्वतःची संस्कृती तर आहेच, पण या भागाचे वैशिष्ट्य म्हणजे या ठिकाणचा निसर्गरम्य आणि रांगडा भूगोल. या सौंदर्यात माथ्यावरचा हिमालय आपली आणखी भर घालत असतो. अन्य ऋतूंमध्ये ओसंडून वाहणारे हे निसर्गसौंदर्य पावसाळ्यात मात्र, निसर्गाचाच कोप झाला की काय, असे वाटण्याइतपत बदलते. मेघालय तर त्याच्या अतिवृष्टीसाठी प्रसिध्दच आहे. कारण, जगात सर्वाधिक पाऊस पडणारे चेरापुंजी याच मेघालयात आहे. या भागात वर्षाला सरासरी १२ मीटर इतका पाऊस पडतो. १९७४ साली तर कहरच झाला. त्या वर्षी या ठिकाणी एका दिवसात २४४५ मिलिमीटर इतक्या धुवांधार पावसाची नोंद झाली.



मेघालयाचा बराचसा भाग डोंगराळ आहे. वरून पाहिल्यानंतर हाताच्या बोटांप्रमाणे किंवा पाठीच्या कण्याप्रमाणे दिसणा-या डोंगरद-या हे या भागाचे वैशिष्ट्य. मेघालयाच्या पूर्वेकडील भागात असणा-या या डोंगररांगांमध्ये खासी जमातींचे वास्तव्य आहे. खासींची गणना आदिवासींमध्ये होते. हा सारा प्रदेश त्यांच्याच नावाने ओळखला जातो. या जमातींना विड्याच्या पानांचे पीक घेण्याकरता अशा गावापासून दूर असलेल्या डोंगररांगांचीच गरज असते. या डोंगररांगा पूर्वेकडे अगदी बांगलादेशच्या सीमेपर्यंत जाऊन मिळतात. खोल द-या आणि घनदाट जंगले यांनी या रांगा एकमेकींपासून वेगळ्या केलेल्या आहेत. त्यामुळे या भागातील रस्ते वळणावळणांचे आहेत. त्यामुळेच स्थानिक लोक या रस्त्यांचा वापर न करता वाटेत येणा-या डोंगररांगा आणि त्यांच्या अंगाखांद्यांवरील ओढे, झरे ओलांडूनच एका ठिकाणाहून दुसरीकडे जाणे पसंत करतात. परंतु, पावसाळ्यात मात्र हा प्रवास विलक्षण जिकिरीचा बनतो. डोंगरांतील हे झरे आणि ओढे पाण्याच्या प्रपाताने तट्ट फुगतात आणि मग येथील गावागावांदरम्यानचा संपर्क पूर्णपणे तुटतो. अशा वेळी, पावसाळ्याच्या चार महिन्यांत असे हातावर हात धरून बसण्यापेक्षा या प्रतिकूलतेवर मात करण्यासाठी खासी लोकांनी आपल्या हिकमती आणि कल्पक धडाडीने या परिस्थितीवर मात करण्यासाठी एक तोडगा शोधून काढलेला आहे. दुथडी भरून वाहणा-या या ओढ्यांना ओलांडून जाण्यासाठी त्यांनी येथील निसर्गालाच हाताशी धरून एक नवे साधन विकसित केले आहे.

मेघालयाच्या या परिसरात विड्याच्या पानाच्या खालोखाल रबराची झाडे (Ficus Elastica) मोठया प्रमाणावर आढळतात. हे झाड या प्रदेशाचे वैशिष्ट्य आहे. या भागात मोठया प्रमाणावर आढळणा-या रबराच्या झाडांच्या वैशिष्ट्यांचा अभ्यास करत त्यांनी पावसाळ्याच्या मोसमात बेफाम वाहणारे ओढे, नाले, ओहोळ पार करण्यासाठी रबराच्या झाडांचे अतिशय वैशिष्ट्यपूर्ण असे पूल बनविलेले आहेत. खासी जमातीमधील कल्पक लोकांच्या सुपीक सर्जनशीलतेमधून विकसित झालेले हे पूल मेघालयाची एक अभिनव ओळख तर बनले आहेतच; पण, त्यांहूनही अधिक म्हणजे, आधुनिक अशा जैवअभियांत्रिकी तंत्रज्ञानाचा (Bioengineering

Technology) एक अनोखा आविष्कार म्हणून भ्रमंतीच्या निमित्ताने या निसर्गरम्य देखण्या परिसराला भेट देणा-या अनेक पर्यटकांच्या आकर्षणाचे ते आताशा केंद्रही ठरत आहेत.

या भागातील रबराच्या या झाडाचे वैशिष्ट्य म्हणजे हे झाड पाण्याच्या कडेने असलेल्या खडकांच्या संगतीने वाढते. मेघालयाच्या परिसराला अनोखी नसणारी अतिवृष्टी आणि त्यांमुळे मोठ्या प्रमाणावर होणारी जमिनीची धूप यांना हे झाड अतिशय चांगल्या प्रकारे सरावलेले आहे. या झाडांची आद्य मुळे (primary roots) तंतुमय प्रकारची (epiphytic) असल्यामुळे ती खडकांच्या पृष्ठभागाला घट्ट धरून ठेवतात. त्या नंतर या झाडांना फुटणारी मुळे (secondary roots) प्रकाशाच्या रोखाने पसरायला लागतात आणि झाडाच्या वाढीची ती निश्चित करतात. या झाडाच्या नेमक्या याच वैशिष्ट्यपूर्णतेचा उपयोग खासी लोकांनी आपल्या लाभासाठी करून घेतलेला दिसतो.

मेघालयाच्या भूमीवर मोठ्या प्रमाणावर आढळणारे विड्याच्या पानांचे वेल बरेच वेळा ओढ्याच्या एका काठापासून ते दुस-या काठापर्यंत पसरलेले असतात. रबराच्या झाडांच्या प्राथमिक मुळांनी एकदा का आपले पाय खडकाच्या पृष्ठभागावर घट्ट रोवले की, त्या नंतर फुटणा-या मुळांची मांडणी खासी लोक विड्याच्या वेलींच्या आधारानेच ती पुढे वाढतील अशा प्रकारे करतात. अशा पद्धतीने या मुळांच्या वाढीची दिशा एकदा का पक्की निश्चित झाली की, रबराची ही झाडे विड्याच्या वेलींच्या आधारेच ओढे अथवा ओहोळाच्या पैलतीरापर्यंत बिनबोभाट जाऊन पोहोचतात. दुस-या तीरावर जाऊन ठेपलेली रबराची ती झाडे ओढ्याच्या त्या तीरावर पुन्हा रुजतात आणि या प्रक्रियेद्वारे एका नैसर्गिक पुलाची पायाभरणी साकारते. कालांतराने मुळांची संख्या आणि लांबी या दोहोंतही वाढ होत राहते. ती मग एकमेकांत गुंतली-गुंफली जातात. त्यांमुळे त्यांची मजबुती अधिकच वाढते. यांतील काही मुळे ओढ्यातील पाण्याच्या प्रवाहाच्या दिशेने प्रवाहाला समांतर अशा प्रकारे वाढत जातात. तर, काही मुळे ही प्रवाहाच्या विरुद्ध दिशेने आपले हातपाय पसरायला लागतात. या प्रक्रियेद्वारे साकारणा-या पुलावरून चालताना, यथावकाश, दोन्ही बाजूंनी हातांनी धरता येईल असे



आधार आपसूकच निर्माण होतात. या सगळ्या सांगाड्याला पुलाचा आकार प्राप्त झाला की, तळाच्या अंगाला ज्या रिकाम्या मोकळ्या जागा उरतात त्यांत सपाट दगड रचून त्या जागा भरल्या जातात.

कालांतराने, ही मुळे आणि त्यांच्या आजूबाजूला वाढलेल्या वेली यांचा वाढविस्तार आणि पसारा वाढत जातो. मुळे आणि वेली यांची परस्परांत गुंपण घडून येऊन पुलाला भक्कमपणा येतो. अशा पद्धतीने तयार झालेल्या पुलाचा रहदारीसाठी वापर त्या नंतरच करणे सोयीचे बनते आणि सुरक्षिततही. ही सगळी प्रक्रिया अशी असल्यामुळेच, या सगळ्या सव्यापसव्यातून साकारलेला सेतू प्रत्यक्ष वापरात येण्यासाठी थोडाथोडका नव्हे तर, चांगला दोन दशकांचा कालावधी उलटून जावा लागतो. मात्र, एकदा का त्यांचा वहिवाटीसाठी वापर सुरू झाला की पुढची किमान १०० ते १२५-१५०वर्षे त्यांना डग नसते. या संदर्भातील सर्वांत उल्लेखनीय बाब म्हणजे, सिमेंट अथवा पोलाद यांचा बांधकामामध्ये वापर करून बांधण्यात आलेल्या पुलांचे आयुष्य वापराच्या वाढत्या वर्षांगणिक घटत राहते. परंतु, रबराच्या मुळांच्या गुंपणीतून सांधला गेलेला हा सेतू मात्र उलटणा-या काळाबरोबर अधिकाधिक मजबूतच होत जातो.

स्थानिक परिसरातील खासी जमाती ज्या त्यांच्या 'खासी' भाषेतून बोलीव्यवहार करतात त्या खासी भाषेत या पुलांना Jing Kieng Deingiri, म्हणजेच, 'रबराच्या झाडाचा पूल' असे म्हणतात. या पुलांची लांबी १० मीटरपासून ते ३० मीटरपर्यंतही असू शकते. या पुलांचे आणखीही एक आगळेपण आहे. ते असे की, मेघालयाच्या परिसरात प्रसंगी अतिवृष्टीपायी जमिनीची धूप होण्याचे प्रसंग वारंवार उद्भवतात. मात्र, अतिवृष्टिपायी जमिनीची धूप घाऊक प्रमाणावर होऊनही हे पूल उत्तमपैकी तग धरून राहतात. केवळ इतकेच नाही तर, हे पूल सजीव वनस्पतींचे बनलेले असल्यामुळे त्यांना वाळवीचा उपसर्ग होण्याचीही शक्यता वा भीती त्या मानाने कमीच असते. किडीचा धोकाही तसा मर्यादितच राहतो.

मेघालयाच्या या परिसरातील Nangriat या नावाच्या गावाजवळील द-याखो-यांमध्ये अशा प्रकारचे बरेच पूल आहेत. या भागातील सर्वांत अधिक लांबीचा गणला जाणारा पूल ३० मीटर लांबीचा असून तो

Nongthymmai या नावाच्या गावाजवळ आहे. हे गाव या Nangriat गावाच्या सुमारे दोन किलोमीटर अलीकडे डोंगरउतारावर वसलेले आहे. विड्याच्या पानांची शेती हा या गावातील लोकांचा उपजीविकेचा मुख्य व्यवसाय होय. Nangriat आणि Nongthymmai या दोन गावांच्यादरम्यान मोडकळीला आलेला एक लोखंडी पूल आहे. कधी काळी याच जागेवर मुळांचा सेतू होता. लोखंडाचा वापर करून उभारलेला हा पूल त्याच्या निर्मितीनंतर अवघ्या काहीच वर्षांत पार दुरवस्थेला येऊन ठेपलेला आहे. त्याची अवस्था इतकी भीषण बनलेली आहे की, अलीकडच्या काळात तर त्याचा वापरही कमालीचा धोकादायक बनलेला आहे.

या आधी निर्देश केलेल्या दोहोंपैकी Nangriat हा गाव ओलांडून काहीच अंतर गेले की, मुळांपासूनच साकारलेला आणखी एक सेतू लागतो. हा पूल पाहण्यासाठी दूरदूरवरून येणारे बहुतेक सगळेच पर्यटक या ठिकाणी आवर्जून गर्दी करतात. एकावर एक अशा दोन पातळ्यांवर या पुलाची उभारणी करण्यात आलेली आहे. त्यांमुळे स्थानिकांच्या भाषेत त्यास, Umsniang Dable Deeker असे नाव आहे. या गावातील रहिवाशांच्या म्हणण्यानुसार, साधारणपणे २० मीटर लांबी असलेला हा पूल ५० माणसांचा भार सहज पेलू शकतो. दळणवळणासाठी या गावातील नागरिक याच पुलावर सर्वस्वी अवलंबून असल्याने त्याचा वापर सततच मोठ्या प्रमाणावर होत असलेला दिसतो. किंबहुना, ये-जा करण्यासाठी या गावातील लोक याच सेतूवर निर्भर असल्यामुळेच एकावर एक अशा दोन पातळ्यांवर या पुलाची बांधणी करण्यात आली असावी, असे अनुमान बांधण्यास जागा आहे. अशा बांधणीचा हा एकचएक पूल या परिसरात असल्याने, अगदी अल्पावधीतच केवळ या गावाचीच नव्हे तर उभ्या मेघालयाचीच जणू तो ओळख बनलेला दिसतो. या सेतूचे हे आगळेपण हेरून, देशाची राजधानी असलेल्या नवी दिल्ली येथील राजपथावर दरवर्षी प्रजासत्ताकदिनाच्या निमित्ताने साज-या होणा-या शोभायात्रेदरम्यान २००४ सालातील २६ जानेवारी रोजी संचलन सोहोळ्यात या पुलाची प्रतिकृती पेश केली गेली. केवळ इतकेच नाही तर, सादरीकरणाचे दुस-या क्रमांकाचे पारितोषिकही या सेतूने त्या वर्षी पटकावले.



मुळांपासून बनलेल्या आणि मेघालयातील खासी जमातीचे आगळेपण ठरणा-या अशा वैशिष्ट्यपूर्ण पुलांबाबत अगदी अलीकडेपर्यंत अतिशय थोड्यांनाच काय ती जुजबी माहिती होती. लेफ्टनंट यूल यांनी Journal of the Asiatic Society of Bengal या नियतकालिकात, चेरापुंजीनजीकच्या आणि मुळांपासून निर्माण केलेल्या अशा पुलांचा उल्लेख १८४४ साली पहिल्यांदा केलेला आढळतो. त्या नंतर मात्र या पुलांकडे अन्य कोणाचेच लक्ष फारसे कधी गेल्याचे दिसत नाही. अलीकडच्या काळात, डेनिस रायन नावाच्या तमीळ व्यक्तीने हे पुल पुन्हा एकवार प्रकाशात आणले. डेनिस रायन हे गृहस्थ पेशाने बँक अधिकारी. या पुलांचे आगळे वैशिष्ट्य आणि महत्त्व अन्य लोकांना पुन्हा एकवार पटवून दिले ते रायन यांनीच. स्थानिक परिसरातील व खासी जमातीतील एका महिलेशी विवाह करून याच परिसरात स्थायीक होऊन उर्वरित आयुष्य याच भागात व्यतीत करण्याचा निर्णय रायन यांनी घेतला. Laitkynsew नावाच्या गावात या दांपत्याने 'चेरापुंजी हॉलिडे रिसॉर्ट' या नावाचे एक रमणीय ठिकाण निर्माण केले आहे. चेरापुंजीपासून दक्षिणेला साधारणपणे २० किलोमीटर अंतरावर हे विश्रांतिस्थळ उभारण्यात आलेले आहे. एका दिवसाच्या भेटीदरम्यान हिंडून सहज बघता येतील अशा अंतरावर वसलेले अनेक पूल या परिसरात आढळतात. त्यांतील काही आहेत घनदाट जंगलात तर काही दूरस्थ आणि तीव्र उतारावर उभारलेले. या ठिकाणांना भेटी देणे, हे सार पूल बघणे, त्या पुलांच्या परिसरात सहलीला जाणे, या पुलांची निसर्गसिद्ध बांधणी न्याहाळणे... अशा नानाविध माध्यमांतून पर्यटनाचे एक आगळेवेगळे प्रारूप या परिसरात अलीकडील काही वर्षांत साकारलेले दिसते.

अशीच गोष्ट आणखी एका पुलाची. हा पूल आहे Laitkynsew याच गावानजीक साकारलेला. या पुलाचे आजवरचे आयुष्यमान गेला बाजार किमान १०० ते १५० वर्षांचे असावे. मेघालयातील अशा पुलांपैकी आज हयात असणारा सर्वांत वयस्कर पूल हाच एक. रबराच्या मुळांपासून आणि नागवेलींपासून बनणा-या जुन्या काळातील पुलांची आजच्या पिढ्यांना नेमकी कल्पना येण्याचे हा पूल हे एकच साधन. जुन्या जमान्यातील पूल कसे असावेत, याची कल्पना या पुलावरून येते. ***(कृपया पृष्ठ २८ पाहावे)***

*(पृष्ठ क्रमांक १० वरून)*

अडथळ्यांची ही शर्यत इथेच खुंटत नाही. श्रमदलात नव्यानेच प्रवेशणाऱ्या तरुणांना जो काही रोजगार मिळतो तोही बहुशः कंत्राटी अथवा हंगामी स्वरूपाचा, कसलीच हमी नसणारा, अनिश्चित, अल्प मुदतीचा आणि कोणत्याही प्रकारच्या सामाजिक सुरक्षेचे कवच नसलेला. ज्यांना रोजगार मिळू शकत नाही, अथवा रोजगार मिळण्याच्या शक्यता नाहीत अशांनी स्वयंरोजगाराचा पर्याय चोखाळावा असा सल्लावजा मार्गदर्शन अनेक ठिकाणी सरसहा केले जात असल्याचे दिसते. पण, तेही काही सोपे नाही. व्यवसायाचा कोणताही पूर्वानुभव नसलेल्या अथवा कोणत्याही प्रकारची व्यावसायिक पार्श्वभूमी न लाभलेल्या होतकरूंना नव्याने व्यवसाय सुरू करताना तर अनंत प्रकारच्या प्रतिकूलतांचा सामना करणे भाग पडते. एक तर, सर्वांत मोठा प्रश्न असतो तो स्वतंत्र उद्योगासाठी भांडवल गोळा करण्याचा. मुळात, वित्तीय अथवा आर्थिक पार्श्वभूमी तुलनेने दुर्बळ असेल तर कर्जापोटी तारण ठेवण्यास अशा इच्छूक उमेदवारापाशी काही नसते. तारण नसेल तर कोणत्याही देशातील संघटित वित्तसंस्था अर्थसाह्याचा हात पुढे करण्यास कां-कू करूलागतात, हा अनुभव सार्वत्रिक आहे. दुसरे म्हणजे, बाजारात अथवा व्यवसायात नवीन उमेदवारांना कोणीच ओळखत नसते. त्यांमुळे पत नसते. तिसरीकडे बाजारपेठेचीही जानपहचान अजून व्हावयाची असते.

कोणत्याही कारणापायी प्रदीर्घ काळ एखादी व्यक्ती बेरोजगार राहिली तर त्यांतून उद्‌भवणारे नानाविध परिणाम व्यक्तिगत तसेच व्यापक सामाजिक स्तरावरही अनिष्ट असेच ठरतात. एक तर, नोकरी अथवा रोजगार न मिळू शकलेली व्यक्ती मनाने खचून जाते. नैराश्य तिला घेरते. बेरोजगारीचे प्रमाण सार्वजनिक पातळीवर वाढणे हा मनुष्यबळासारख्या एका अतिशय मौल्यवान साधनसामग्रीचा घाऊक अपव्यय ठरतो. या अपव्ययाची जबर आर्थिक किंमत संबंधित अर्थव्यवस्थेला या ना त्या रूपात सोसावी लागते. तिसरे म्हणजे, बेरोजगारीचे मोठे प्रमाण प्रदीर्घ काळ नांदले तर संबंधित देशाच्या सरकारची तिजोरी भाराखाली वाकते. कारण, तरुणाईची उत्पादकता, उत्पादन व उत्पन्न हे तुलनेने नेहेमीच सरस ठरते.



मुळात, हातांना पुरेसा उत्पादक व दर्जेदार रोजगार न मिळालेले तरूण अर्थव्यवस्थेत मोठ्या प्रमाणावर असतील तर सरकारच्या तिजोरीवर त्याचा पडणारा भार हा दुहेरी स्वरूपाचा असतो. एक तर, अशा बरोजगार तरुणांना कोणत्या ना कोणत्या स्वरूपात सामाजिक सुरक्षेचे काहीबाही कवच पुरवणे सरकारला भाग पडते. त्यांपायी सरकारचा खर्च वाढतो. आणि दुसरीकडे, तरूण माणसे बेरोजगार राहिल्याने त्यांच्याकडून मिळू शकणाऱ्या करमहसूलावर सरकारला पाणी सोडावे लागते. तिसरीकडे, देशातील वयोवृद्ध व ज्येष्ठ नागरिकांच्या निर्वाह व संगोपनासाठी सरकारला महसूल उत्पन्न होत असतो तो तरुणाईच्या कमाईतूनच. मुळात तरूण हातांनाच मोठ्या प्रमाणावर रोजगार नसेल तर सरकारचे सगळे वित्तीय व्यवस्थापनच ताणाखाली येते. सगळ्यांत महत्त्वाचे म्हणजे, बेरोजगारीची ही व्याधी स्वयंप्रेरक, स्वयंपोषित आणि स्वयंपूरक शाबीत होते. एखादी व्यक्ती जितका अधिक काळ रोजगारवंचित राहील तितकी तिची व्यावसायिक कौशल्ये व तांत्रिक-व्यावसायिक ज्ञान जुने, अप्रस्तुत ठरत राहते. दुसरीकडे तिचे वयही वाढत असते. नवनवीन यंत्र-तंत्रे शिकण्याची तनमनाची शक्ती वाढत्या वयाबरोबर लडखडत राहते. वाढत्या वयाबरोबर मनुष्याचा आत्मविश्वासही अंमळ डळमळीत व्हायला लागतो. तांत्रिक प्रगतीचा व वैज्ञानिक संशोधनाचा झपाटा आताशा प्रचंड वाढलेला असल्यामुळे उत्पादन प्रक्रियेमध्ये वापरले जाणारे तंत्रशास्त्रही जगभरात सर्वत्रच अधिकाधिक प्रगत, अद्ययावत व उच्च दर्जाचे बनत जाते आहे. साहजिकच, असे अत्याधुनिक तंत्रज्ञान कार्यक्षमपणे हाताळण्यासाठी तितक्याच कुशल व नेमक्या प्रशिक्षणाने युक्त असलेल्या मनुष्यबळाला उद्योगव्यवसायाच्या क्षेत्रांकडून आताशा प्रामुख्याने मागणी येते आहे.

आणि आजघडीला जगभरातील अनेक देशांमधील शिक्षणव्यवस्था नेमक्या याचबाबतीत अपुऱ्या व थिट्या ठरत आहेत. ज्या प्रकारच्या प्रशिक्षित मनुष्यबळाची उद्योगव्यवसायांना अपेक्षा व गरज आहे तशा प्रकारचे प्रशिक्षित व कुशल मनुष्यबळ निर्माण करण्याच्याबाबतीत अनेक ठिकाणच्या प्रचलीत शिक्षणव्यवस्था अक्षम ठरताना दिसतात. यांतूनच, संरचनात्मक बेरोजगारीची (स्ट्रक्चरल अन्‌एम्प्लॉयमेन्ट) समस्या अनेक देशांमध्ये उग्र बनते आहे.

या सगळ्यांपायी, श्रमदलात नव्याने दाखल होणा-या तरूण उमेदवारांच्या सर्जक हातांना चांगला, उत्पादक असा रोजगार मिळणे सध्या अवघड बनते आहे. मनुष्यबळविषयक तज्ज्ञांच्या मते, उमेदवारीच्या काळातील पहिली १० वर्षे ही अतिशय कळीची असतात. कारण, रोजगार मिळवण्यासाठी आणि मिळालेला रोजगार टिकवण्यासाठी आवश्यक असलेली 'सॉफ्ट स्किल्स्' माणूस त्याच काळात हस्तगत करत असतो. शिस्तबद्धता, कामातील नेटकेपणा, सहका-याबरोबर मिळून-मिसळून काम करणे, कामाचे वाटप समजावून घेणे, संवादकौशल्ये, काळ-काम-वेग यांचे गणित सांभाळणे यांसारखी कौशल्ये बहुतेकदा प्रत्यक्ष काम करत असतानाचा माणूस शिकत राहतो. म्हणूनच, चार भिंतींच्या वर्गातील शिक्षण-प्रशिक्षण झाल्यानंतर लगेचच नोकरी अथवा रोजगार मिळणे महत्त्वाचे ठरते. जागतिक बँकेने अलीकडेच व्यक्त केलेल्या अंदाजांनुसार, येत्या सुमारे दशकभराच्या काळात श्रमांच्या जागतिक बाजारपेठेत अदमासे १०० कोटी तरूण नव्याने दाखल होतील. परंतु, शिक्षण-प्रशिक्षण-रोजगार या तीनही संदर्भातील प्रचलीत व्यवस्था बघता त्यांपैकी जेमतेम ४० टक्के तरूणच काय ते रोजगार पदरात पाडून घेण्यात यशस्वी ठरतील. बाकीच्या होतकरू तरुणांसाठी रोजगारसंधी कशा निर्माण करावयाच्या हा जगातील जवळपास सर्वच देशांमधील धोरणकर्त्यांच्या पुढ्यातील यक्षप्रश्न बनतो आहे.

त्यांतल्या त्यांत, जर्मनी आणि ऑस्ट्रिया या दोन देशांनी या समस्येवरील उता-याच्या दिशा उजळलेल्या आहेत. व्यावसायिक शिक्षणाच्या, कौशल्यशिक्षणाच्या अतिशय कल्पक व्यवस्था या दोन देशांनी विकसित केलेल्या दिसतात. मनुष्यबळाच्या बाजारपेठेतील मागणी व पुरवठ्याचे समीकरण आणि एकंदरीने देशातील उद्योगव्यवसायांकडून निर्माण होणारी मनुष्यबळविषयक गरज यांचा तत्परतेने मागोवा ही व्यवस्था घेत राहते. व्यावसायिक तसेच धंदेशिक्षणाच्या संस्थांमधून शिकवले जाणारे अभ्यासक्रम, कौशल्ये, शिकवण्याच्या पद्धती यांत बाजारपेठीय कलांनुसार वेळोवेळी अनुरूप असे बदल प्रशिक्षणाची ती व्यवस्था घडवत राहते. उद्योगव्यवसाय घटकांबरोबर सततचा संवाद आणि प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये पुस्तकी अध्ययनापेक्षाही प्रात्यक्षिके व हस्तानुभवावर भर ही या व्यवस्थेची वैशिष्ट्ये.



**ना गुणवत्तापूर्ण शिक्षण ना निवारा**

जगभरात एकंदरीनेच शालेय तसेच विद्यापीठीय शिक्षणाचा प्रसार आता अतिशय व्यापक प्रमाणावर झालेला आहे. केवळ इतकेच नाही तर, प्रशिक्षित मनुष्यबळालाच आजच्या उत्पादनव्यवस्थेमध्ये चांगल्यापैकी संधी असल्याचे ध्यानात येत असल्याने पूर्वीपेक्षा अधिक काळ शिक्षणामध्ये व्यतीत करण्याकडे सर्वत्रच सरासरीने कल वाढतो आहे. परंतु, शिक्षणाच्या प्रसारावर अतिरिक्त भर देत आल्याने आजमितीस शिक्षण-प्रशिक्षणाच्या गुणवत्तेकडे सार्वत्रिक दुर्लक्ष होत राहिलेले आहे. त्यांमुळे, शिक्षण घेऊनही चांगली नोकरी अथवा रोजगार मिळेलच याची शाश्वती कोणालाच सध्या नाही. शिक्षण-प्रशिक्षणाच्या सुविधा शहरी भागांमध्ये तुलनेने ब-या असतात असा सरासरीने ग्रह असल्यामुळे ग्रामीण भागांतून शिक्षण आणि नंतर रोजगार यांच्या शोधार्थ शहरांकडे धाव घेणा-यांचे लोंढे जगभरात सर्वत्रच फुगत आहेत. त्यांतून शहरीकरणाने जगाच्या वेगवेगळ्या भागांत प्रचंड वेग धारण केलेला दिसतो.

स्थलांतरणाद्वारे एकंदरीनेच कोणत्याही मनुष्याची उत्पादकता सरासरीने चांगल्यापैकी उंचावते, ही बाब आजवर ठिकठिकाणी करण्यात आलेल्या संशोधनांद्वारे अधोरेखित झालेली आहे. त्यांमुळे, आजघडीला चांगले होतकरूतरूण शक्यतो लवकरात लवकर आपले राहते गाव व घर सोडून नवनवीन क्षितिजे धुंडाळण्यासाठी बाहेर पडण्याच्या तयारीत दिसतात. स्थलांतरादरम्यानच्या संभाव्य धोक्यांना तोंड देण्याची या तरुणांची मानसिक तयारीही मोठी मजबूत असते.

मात्र, शहरांकडे धाव घेऊनही शिक्षण वा रोजगाराचे प्रश्न अंमळ हलके होतील, याची शक्यताही आता पूर्वीइतकी भरीव राहिलेली नाही. जगभरातच शहर नियोजनामध्ये नवनवीन बांधकामांवर नियंत्रणे आणण्याचे पर्व सध्या बहरात आहे. त्यांमुळे, घरांची शहरी मागणी व पुरवठा यांतील दरी दिवसेंदिवस रुंदावतच चाललेली आहे. विशेषतः परवडण्याजोग्या घरांच्याबाबतीत तर ही समस्या जीवघेणी आहे. परिणामी, मोठ्या शहरांमध्ये राहायचे कसे व कोठे ही आजच्या तरुणाईच्या पुढ्यातील मोठी अडचण आहे. आजचा वैश्विक तरूण सैरभैर दिसतो तो या सगळ्यांपायीच ! ■■

आरोग्य

# साखरेची सुट्टी !

सणासुदीच्या प्रसंगी गोडधोड करण्याची आपल्याकडील परंपरा अतिशय प्राचीन आहे. एकमेकांमध्ये नांदणा-या नात्यांतील गोडवा टिकवून धरण्याची भावना त्यामागे असावी, असे समजणे वावगे ठरणार नाही. ही परंपरा जपण्या-जोपासण्याकडे जवळपास सगळ्यांचाच कल असल्याने सणासुदीचा मोसम आला की बाजारात मिठाईची रेलचेल दिसू लागते. गोड पदार्थांच्या विक्रीला बहर येतो. पेठेत जसजसा गोडाचा वावर वाढत्या प्रमाणावर सुरूहोतो तसतसा आरोग्यविषयक चर्चांचा आवाजही तापायला लागतो. आरोग्याबाबत चौफेर झडणा-या साधकबाधक चर्चांच्या केंद्रस्थानी स्वाभाविकपणेच असते ती या मिठाई व गोडाधोडाच्या जिनसांतील साखर.

घरीदारी बनवण्यात आलेल्या आणि/अथवा बाजारातून तयारच विकत आणलेल्या गोड खाद्यपदार्थांमध्ये मुख्यतः समावेश असतो तो दुग्धजन्य पदार्थ, आहारात प्रविष्ट होणारे खायचे रंग, पदार्थ टिकावेत यासाठी त्यांत आवर्जून मिसळले जाणारे रासायनिक घटक आणि भरपूर प्रक्रिया केलेली साखर. बघताक्षणी तोंडाला पाणी सुटणा-या या पदार्थांमधील साखरच आपल्या जिभेला त्या पदार्थांची चटक लावते, आपल्याला त्या पदार्थांच्या चक्क मोहात व प्रेमात पाडते आणि मग अशा चटकमटक पदार्थांच्या केल्या जाणा-या सततच्या सेवनामुळे आरोग्याचे नाना प्रश्न डोके वर काढू लागतात. कळत-नकळत, प्रसंगोपात्त अथवा सरसहा केल्या जाणा-या साखरेच्या अशा अतिसेवनापायी, मग, शरीरातील ‘इन्शुलीन’चे प्रमाण व मात्रा विस्कटण्यापासून ते वाढत्या चरबीपर्यंत एक ना दोन असंख्य समस्या मान वर काढू लागतात. घरी केलेल्या अथवा बाजारातून आणलेल्या खाद्यपदार्थांची गोडी वाढवणा-या या अशा धोकादायक साखरेलाच पर्याय शोधण्याच्या धडपडीतून आता सर्वच संबंधितांचे लक्ष वळते आहे ते नैसर्गिक अवस्थेतच गोड, मधुर असणा-या अनेकानेक पदार्थांच्या दिशेने.



निसर्गसिद्ध अवस्थेतच गोड असणा-या जिनसांची आपल्याकडे खरोखरच खैरात सापडते. त-हेत-हेची फळफळावळ, कंद, कणसे, फळभाज्या, मध, धान्ये...अशी, निसर्गदत्त गोड जिनसांची बरीच लांब आणि वैविध्याने नटलेली चांगली भरगच्च यादी तयार होईल. आपल्याला रु चणा-या गोड पदार्थांच्या रसोईमध्ये अशा निसर्गदत्त गोडी लाभलेल्या फळे, भाज्या, कंद यांत सामावलेल्या गोडव्याचाच गोडी निर्माण करण्यासाठी वापर करायचा. त्याचे लाभ दोन. एक म्हणजे, हा गोडवा नैसर्गिकच असल्यामुळे आपल्या आरोग्यावर त्याचा कोणताही अनिष्ट परिणाम घडून येण्याचा, प्रकृतीला अपाय होण्याचा प्रश्न तर दूरच; उलट, त्यांतील पौष्टिक घटकांपायी तब्येतीला लाभच संभवतो. या दृष्टीने, आपल्याकडील सर्वच फळे अतिशय उपयुक्त. कारण, दस्तुरखुद्द निसर्गानेच त्यांच्या ठायी साखरेचा साठा संचयित करू न ठेवलेला असतो.

निसर्गदत्तरीत्या गोडी संकलित झालेल्या सृष्टीतील आपल्या परिचयाच्या अशा पदार्थांपैकीच रताळे हे एक कंदमूळ. या रताळ्याचाच मुक्त वापर करीत अगदी आताआतापर्यंत आपल्याकडे नानाविध गोड पदार्थ बनवलेज जात असत. रताळे उकडून ती कुस्करायची. तो कुस्करा मग तुपामध्ये शिजवायचा. तुपात शिजवलेल्या त्या कुस्क-यात काजू, बदाम यांसारखे शाही पदार्थ घातले की घरच्याघरी एक रु चकर हलवा तयार. खरपूस भाजलेले रताळे त्याची साल काढून मलईत अथवा सायीमध्ये मिसळले की एक चविष्ट ‘डेझर्ट’ तयार होऊ शकते. या शिवाय, खीर, रबडी, उपवासाचे विविध पदार्थ रताळ्यांपासून तयार करता येतात. हे सारेच पदार्थ जसे तुलनेने ब-यापैकी स्वस्त तसेच मुबलक पौष्टिक मूल्ये प्रदान करणारे. रताळ्यांद्वारे आपल्या शरीराला ‘अ’ जीवनसत्त्व तसेच खनिजे मिळतात. आणि, बाहेरून साखर न घालताही चांगल्या चवीचे गोड पदार्थ चाखायला मिळतात.

तांदळाची खीर हा आणखी एक असाच बहारदार गोड पदार्थ. बिहारच्या अनेक प्रांतांत आजही तो भरपूर प्रमाणावर प्रचलीत दिसतो. हंगामात नव्यानेच तयार झालेल्या तांदळापासूनही ही खीर बनवता येते. गोडीसाठी त्यांत उसाचा ताजा रस मिसळला जातो. प्रसाद म्हणून आजही

हा पदार्थ बिहारमध्ये सर्वत्र सरसहा भाविकांना वाटण्यात येतो. जेवणानंतर काही तरी 'स्वीट डिश्' अथवा 'डेझर्ट' घेण्याची संस्कृती आपल्या खाद्यविश्वात अगदी अलीकडे कुठेशी अंमळ रुजते आहे. पूर्वी मात्र 'डेझर्ट'साठी घरी पकवलेले असे पारंपरिक पदार्थच वाढले जात असत. अशाच प्रकारे घरच्याघरी तयार करता येणारा आणखी एक गोड पदार्थ म्हणजे फणसाचा हलवा. चांगल्यापैकी पिकलेल्या फणसाचे मधुर गरे, दूध, दही किंवा ताजी मलई यांचा वापर करून हा पदार्थ अनेक कुटुंबांत बनवला जातो. फणसाचे चांगले पक्व गरे शिजवून नंतर ते तुपामध्ये मिसळूनही चविष्ट असे गोड खाद्यजिन्नस तयार केले जातात.

सफरचंदांपासून असाच एक लाजबाब पदार्थ हिमाचल प्रदेशामध्ये बनवण्यात येतो. हा पदार्थही दिसतो व चवीला लागतो हलव्यासारखाच. सफरचंदांखेरीज त्यांत बेदाणे, बदाम यांचा समावेश केलेला असतो. पदार्थांमध्ये गोडीसाठी बाहेरून साखर घालण्याऐवजी त्या त्या प्रांतांत सहजगत्या उपलब्ध होणारी फळे अथवा कंद वापरून तयार केले जाणारे अशांसारखे सारेच पदार्थ हे पौष्टिक तर असतातच, शिवाय, ते बव्हंशी प्रदेशनिष्ठ असल्यामुळे आपापली प्रांतिक 'आयडेन्टिटी'ही ते हिरिरीने टिकवून असतात.

आंब्यांपासून बनवले जाणारे असंख्य पदार्थ या यादीत कदाचित अग्रस्थानीच शोभतील. गोड, रसाळ आंब्यांपासून तयार केले जाणारे आम्रखंड अथवा आंबरस (आमरस) हे दोन्ही पदार्थ खवय्येप्रिय पक्वान्न म्हणून आजमितीस सर्वदूर विख्यात आहेत. आताशा अनेक ठिकाणी सिताफळांपासून रबडी अथवा कुल्फी बनवली जाते. सिताफळाच्या ठायी असणाऱ्या नैसर्गिक गोडव्याचाच आधार या दोन्ही गोड पदार्थांना पुरविलेला असतो. सिताफळासारख्या फळामध्ये बियांची महामूर गर्दी असल्याने त्याच्या गराची निर्भेळ गोडी सुरळीत, सुकरपणे चाखणे नाही म्हटले तरी थोडेस अवघडच जाते. परंतु, सिताफळातील गर बाजूला काढून त्यांपासून रबडी वा कुल्फीसारखे खाद्यपदार्थ बनवले तर सिताफळाची लज्जत सुगमपणे चाखता येते. आइस्क्रिम तयार करणाऱ्या अनेक कंपन्यांनी आताशा सिताफळांचा त्यांच्या गोडीसाठी आइस्क्रिममध्ये वापर चालू केलेला आहे.



साखरेला पर्याय शोधून त्यांद्वारे गोडधोड बनवता यावे, यासाठी ही सारी धडपड चालू आहे. नैसर्गिक गोडवा असलेले काही पदार्थ आपल्याला वर्षभर खाता येतात. खजुराचा हलवा अगर खजूर घालून तयार केलेले अन्य काही पदार्थ असेच वर्षभर चाखता येणे शक्य असते. सिंधी व्यापाऱ्यांनी थाटलेल्या मिठाईच्या दुकानांत आपल्याला सुकामेवा घातलेली खजुराची मिठाई मिळते. तसे बघितले तर, सुकामेवा वापरूनही नाना प्रकारचे गोड पदार्थ तयार करण्यात येतात. एका अंगाने गोडी आणि दुसरीकडून पौष्टिकता, असा दुहेरी लाभ या मिलाफ त्या पदार्थांची लज्जत चाखणाऱ्याला मिळवून देत राहतो. नाना प्रकारची खनिजे आणि जीवनसत्त्वे सुकामेव्याद्वारे आपल्या शरीराला मिळत राहतात. सुकामेव्यामध्येही शर्करेचे प्रमाण चांगल्यापैकी असले तरी बाजारातून जी साखर आपण विकत आणतो तिच्याप्रमाणे सुकामेव्यातील शर्करा प्रकृतीला हानीकारक ठरत नसते. सुकामेवा वापरून नाना प्रकारची मिठाई करण्यातील, प्रकृतीच्या दृष्टीने, मोठा लाभ म्हणजे अशा पदार्थांद्वारा तंतुमय पदार्थांची पुरेशी मात्रा शरीराला मिळत राहते. अशी मिठाई वा गोडधोड तयार करण्यासाठी साजूक तूप वापरले असेल तर ते अधिकच इष्ट ठरते. सुकामेव्याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे, मिठाई तयार करण्यासाठी प्रसंगी सुकामेवा शिजवणे गरजेचे ठरले तरी त्यांमुळे त्यांतील खनिजांची हानी होत नाही. ती तशीच शाबूत राहतात.

फळे, कंद, धान्ये, सुकामेवा अशांसारख्या जिनसांच्या बरोबरीनेच मधाचा वापर करूनही नैसर्गिक गोडवा प्रदान करणारे अनेक खाद्यपदार्थ आपल्याला तयार करता येतात. आपल्या देशाच्या वेगवेगळ्या प्रांतांतील अनेक स्थानिक खाद्यपदार्थांमध्ये साखरेऐवजी मधाचा वापर करण्यात येतो. हा सारा खटाटोप आहे तो बाहेरून साखर न घालता गोडधोड आणि मिठाई तयार करण्यासाठी. निसर्गदत्त गोडवा प्रदान करणाऱ्या पदार्थांपासून एकादे पक्वान्न वा हलकाफुलका जिन्नस अथवा 'डेझर्ट' घरच्याघरी पकवायचे. त्याची लज्जत मनसोक्त चाखायची आणि त्याच्या जोडीनेच पौष्टिकताही पदरात पाडून घ्यायची.... आणि हे सगळे पुन्हा आपल्या आरोग्याच्या मुळावर येणाऱ्या साखरेची सुट्टी करून... आहे की नाही मज्जा ! ■■

जिकडेतिकडे

# वाढणारी शहरे, फुगणा-या झोपडवस्त्या

शहरीकरणाचा जणू विस्फोट होत असलेल्या पर्वातून सध्या सगळे जग पुढे सरकते आहे. भारतही त्याला अपवाद नाही. शहरीकरणाचा वाढविस्तार घडून येण्याच्या प्रक्रियेत आपल्या देशात जो तीव्र असमतोल दिसून येतो त्यांपायी आकारमानाने मोठी असणारी शहरे लोहचुंबकाप्रमाणे लोकसंख्या, उद्योग, औद्योगिक गुंतवणूक, भांडवल स्वतःकडे आकर्षित करून घेत राहतात. त्यांपायी, शहरी जमिनींच्या बाजारपेठेत सर्वत्रच प्रचंड तेजी दिसते. त्यांमुळे, मोठ्या शहरांमधील निवासी घरांच्या बाजारपेठेचा सारा तोलच कमालीचा विस्कळीत झालेला आहे. आघाडीच्या महानगरांमध्ये तीव्र तुटवडा जाणवतो तो सर्वसामान्यांना परवडण्याजोग्या निवासी गाळ्यांचा. शहरोशहरी हातपाय पसरणा-या झोपडवस्त्या म्हणजे शहरी निवा-याच्या विद्यमान दुरवस्थेचे दशावतारच जणू ! विलक्षण दुःसह जीवनमान वाट्याला येत असूनही या झोपडवस्त्यांमध्ये कोट्यवधी नागरिक निवारा शोधत राहतात कारण अखेर उपजीविकेच्या संधी या मोठ्या शहरांतच उपलब्ध होत आहेत, याच रोकडा अनुभव त्यांनी पदरी बांधलेला असतो.

अस्ताव्यस्त वाढणा-या अशा शहरीकरणापायी प्रत्यही फुगणा-या झोपडवस्त्यांबाबतचे जे वास्तव आपल्या देशात दर दहा वर्षांनी आयोजित केल्या जाणा-या जनगणनांद्वारे पुढ्यात उभरते ते खरोखरच चिंतनीय आणि त्यांहीपेक्षा अधिक चिंताजनक असेच आहे. मानवी निवा-याच्या दृष्टीने सर्वतोपरी अयोग्य व अनिष्ट असणारी बांधकामे, निवासी गाळे आणि अशा निवा-यांनी व्यापलेल्या परिसरांना ‘झोपड्या’ अथवा ‘झोपडवस्ती’ असे संबोधण्यात येते. १९५६ साली अस्तित्त्वात आलेल्या झोपडवस्त्या क्षेत्र सुधारणा अधिनियमाच्या कलम तीनमध्ये ही व्याख्या सुस्पष्टपणे नमूद केलेली सापडते. मोडकळीला आलेला घराचा सांगाडा, अत्यंत दाटीवाटीचा सहनिवास, बांधकामाचा सदोष आराखडा व बांधणी, वस्तीअंतर्गत अपुरे व



अरुंद रस्ते, मोकळ्या हवेचा अभाव, उजेड तसेच मलमूत्रविसर्जनाच्या सुविधांची वानवा... अशांसारख्या विविध घटकांपायी मानवी जीवन, आरोग्य व नैतिकता यांची हानी करणा-या वस्त्यांना ‘झोपडवस्त्या’ असे १९५६चा हा कायदा संबोधतो.

झपाट्याने विस्तारणा-या असमान नागरी वाढीपायी २००१ ते २०११ या अगदी अलीकडील दशकात आपल्या देशातील झोपडवस्त्यांच्या चित्रात काय बदल घडून आलेले आहेत याची केवळ झलकदेखील अस्वस्थ करणारी ठरते. झोपडवस्त्यांमध्ये वास करणा-या आपल्या देशातील एकूण नागरिकांच्या संख्येमध्ये २००१ ते २०११ या काळात तब्बल २५ टक्क्यांनी वाढ घडून आली. २००१ सालातील जनगणनेनुसार, आपल्या देशातील एकंदर नागरी विभागांपैकी १७४६ नागरी विभागांनी झोपडवस्त्यांचे त्यांच्या परिक्षेत्रात अस्तित्व नोंदविले होते. आपल्या क्षेत्रात झोपडवस्त्या आहेत, असे नोंदविणा-या नागरी विभागांची संख्या, २०११ सालच्या जनगणनेनुसार, २६१३वर जाऊन पोहोचल्याचे ध्यानात येते.

‘आमच्या परिक्षेत्रात झोपडवस्त्या नाहीत’, असे वास्तव नोंदविणा-या आपल्या देशातील प्रदेशांची संख्या दिवसेंदिवस घटते आहे, ही एकच बाब झोपडवस्त्यांची निर्मिती व वाढ ही प्रक्रिया किती व कशी सार्वत्रिक बनते आहे, या वास्तवाची द्योतक ठरावी. हिमाचल प्रदेश, सिक्कीम, अरुणाचल प्रदेश, नागालँड, मिझोराम, मणिपूर, दमण आणि दीव, दादरा व नगर-हवेली आणि लक्षद्वीप अशा आपल्या देशातील नऊ राज्ये व केंद्रशासित प्रदेशांनी आपल्या परिक्षेत्रात झोपडवस्त्या नसल्याचे वास्तव २००१ सालच्या जनगणनेदरम्यान नोंदविलेले होते. २०११ सालातील जनगणनेनुसार, मणिपूर, दमण आणि दीव, दादरा व नगर-हवेली आणि लक्षद्वीप हे, २००१ सालातील यादीमधील, केवळ चारच प्रदेश आपापल्या परिक्षेत्रात ‘झोपडवस्त्या नाहीत, असे नोंदवितात. म्हणजेच, हिमाचल प्रदेश, सिक्कीम, अरुणाचल प्रदेश, नागालँड आणि मिझोराम या आपल्या देशाच्या ईशान्येकडील आणि तुलनेने अ-विकसित व नागरीकरणाच्या वाढविस्तारात तुलनेने पिछाडीवर गणल्या जाणा-या भूभागांतदेखील आताशा झोपडवस्त्या वाढत आहेत.

या सगळ्यावरून आपण काय बोध घेणार ? ■■

*(पृष्ठ क्रमांक ४ वरून)*

या निर्मितीक्षम हातांना पुरेसा आणि दर्जेदार, उत्पादक स्वरूपाचा रोजगार पुरविण्यात आपण यशस्वी झालो नाही तर, काही ना काही रचनात्मक कार्य जीवनामध्ये उभे करण्यासाठी आसुसलेली हीच तरुणाई केवळ नाइलाजाने विध्वंसक मार्गांकडे झुकेल, अशी रास्त भीती आपल्या सगळ्यांनाच आज वाटते आहे. केवळ आपल्या देशातीलच नव्हे तर, सर्वसाधारणपणे उभ्या जगातीलच तरुणाई आजमितीस कमालीची अस्वस्थ आणि सैरभैर आहे. एका मोठ्या विचित्र कोंडीमध्ये सापडलेल्या या तरुणाईच्या त्या सैरभैर अवस्थेस कारणभूत ठरत असलेल्या परिस्थितीचे काही मनोज्ञ कवडसे 'अर्थबोधपत्रिके'च्या या अंकात मांडलेले आहेत. एकाच वेळी अंतर्मुख बनवणारे आणि त्याच वेळी कमालीची अस्वस्थता प्रदान करणारे असेच ते सारे चित्र आहे. जगात सर्वत्रच अनंत व मूलभूत स्वरूपाचे बदल घडत आहेत. शिक्षणाचे आणि उच्च शिक्षणाचे प्रमाण सर्वदूर अत्यंत चांगल्या प्रकारे उंचावलेले दिसते. वाढत्या शिक्षणाबरोबर सर्वसामान्य सुशिक्षितांच्या अपेक्षांची कमान उंचावत राहावी, हेही तितकेच स्वाभाविक व सहजच म्हणावे लागते. दुसरीकडे शहरीकरण अप्रतिहतपणे आपले हातपाय पसरते आहे. माध्यमांनी आपल्या जगण्याचे जवळपास सगळेच कोपरे व्यापून टाकलेले आहेत. शहरी भाग आणि ग्रामीण परिसर यांच्यातील 'डिजिटल द्वैता'ची दरी पूर्वीच्या तुलनेत आज खूपच निरुंद बनलेली आहे. आपल्या समाजातील रोजगाराच्या आकृतिबंधावरही या सगळ्या स्थित्यंतरांचे परिणाम आता वेगाने जाणवू लागलेले आहेत. या बदलांचा बहुधा सगळ्यांत मोठा फटका जाणवतो आहे तो शेतीला आणि शेतकरी वर्गाला. रोजगाराचा एक मार्ग म्हणून स्वेच्छेने शेतीकडे बघणाऱ्यांच्या संख्येला व प्रमाणाला वेगाने ओहोटी लागते आहे. त्यांमुळे, शेतीच्या व्यवसायाला आज तुटवडा जाणवतो तो राबणाऱ्या हातांचा. दुसरीकडे, शहरांकडे वाहणाऱ्या लोंढ्यांपायी शहरी निवासाचा प्रश्न विलक्षण जटिल बनतो आहे. झोपडवस्त्यांचा अप्रतिहत वाढता पसारा, ही त्याची अपरिहार्य परिणती ठरते आहे. या काही घडामोडींचा मागोवाही या अंकात घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. ■■



*(पृष्ठ क्रमांक१६ वरून)*

जुन्या पुलांचा हा एक उत्तम नमूनाच जणू ! वयाची शंभरी उलटून गेलेली असली तरी या पुलाची पिंडप्रकृती आजही चांगल्यापैकी ठणठणीत आहे, हीच त्याची सर्वांत महत्त्वाची खासियत. या पुलाचे कठडे, त्याची मूळ चौकट आजघडीलाही चिरेबंदी आहे. मेघालयातील अशा अनोख्या पुलांविषयीची ख्याती जसजशी अधिकाधिक प्रमाणावर प्रसृत होते आहे, नजरबंदी करणाऱ्या या नैसर्गिक नजाऱ्याचा महिमा जसजसा कर्णोपकर्णी होतो आहे, तसतसा जिज्ञासू व उत्सुक पर्यटक दर्शकांचा या परिसराकडे वाहणारा प्रवाह दिसीमाशी बाळसे धरतो आहे. परिणामी, दळणवळणाची प्राथमिक साधन म्हणून स्थानिकांनी विकसित केलेल्या या सेतूंचा आजमितीस त्यांना दुहेरी लाभ मिळतो आहे. स्थानिकांना बाहेरच्या विश्वाबरोबर जोडणारा संपर्काचा सेतू म्हणून आजवर या पुलांनी मोठी मोलाची कामगिरी बजावली. दळणवळणाचे माध्यम म्हणून कळीची भूमिका पार पाडली. आजघडीला, याच पुलांच्या असाधारणत्वाकडे आकर्षित होत असलेल्या पर्यटकांच्या प्रवाहाद्वारे या परिसरातील रहिवाशांवर लक्ष्मी उदंड प्रसन्न होते आहे. ■■

**मौज प्रकाशन गृह आणि भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी यांच्या संयुक्त विद्यमाने नवे प्रकाशन**

**उदारमतवादाच्या संस्कृतीचे बीजारोपण करीत १९व्या शतकातील भारतीय प्रबोधनास आकार देणाऱ्या रानडे-तेलंग-चंदावरकर या तीन लोकोत्तर व्यक्तींच्या कार्यकर्तृत्वाचा विश्लेषक आलेख**

**तीन न्यायमूर्ती आणि त्यांचा काळ**

**लेखक - नरेन्द्र चपळगावकर**

**पृष्ठे : ३१५ किंमत : ३००/- रुपये**

**समाजपुरुषांचा वारसा आणि वसा यांचे उचित भान आणून देणारा संशोधनपूर्ण वाचनीय दस्तऐवज**

प्रमुख संदर्भ


**(A) Magazines -**

(1) Geographical, March 09, 2016. (2) Down To Earth, 15 November 2015. (3) The Economist, January 23 to 29, 2016, Volume 418, Number 8973.

**(B) Books and Reports -**

(1) Primary Census Abstract for Slum, Census of India - 2011, Office of the Registrar General and Census Commissioner, Government of India, New Delhi, 30.09. 2013.

**(C)Websites-**

(1) www.atlasobscura.com (2) www. mnn.com
(3) www.cherrapunjee.com (4) www. thehindn.com


■■


# दुसरी आवृत्ती प्रकाशित

***आपल्या दैनंदिन जीवनावर प्रभाव पाडणा-या क्रांतिकारी मेंदूसंशोधनावरील आकर्षक, सचित्र व संग्राह्य ग्रंथ***

# कर्ता-करविता

## आधुनिक मेंदूसंशोधन व आपले जीवन

लेखक - रमेश पानसे, राज्यश्री क्षीरसागर, अनिता देशमुख-बेल्हेकर

**मराठी भाषेला अभिमान वाटावा असे पुस्तक - डॉ. ह. वि. सरदेसाई**

●मेंदूसंशोधन ही एक क्रांतीच! मानवी जीवनाला अधिक उच्च टप्प्यावर नेणारी ऐतिहासिक घटना! या क्रांतीचा आलेख रेखाटणारा ग्रंथ.

पृष्ठे २४२ किंमत ३५०/-रु पये




## भेट अंक योजना

'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना एक 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना 'पत्रिके'चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथालयाचाही लाभ घेता येईल.

### 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांसाठी वाचनसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य विषयांवरील सुमारे बारा हजारांवर उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. केवळ इतकेच नाही तर, इकॉनॉमिस्ट, डाउन टू अर्थ, करंट सायन्स, इकॉनॉमिक ॲन्ड पोलिटिकल वीकली यांसारख्या विख्यात नियतकालिकांचे गेल्या अनेक वर्षांचे अंकही संग्रहात आहेत. 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ विनामूल्य घेता येईल. या वाचनसंधीबाबत अधिक तपशीलासाठी व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.

## 'अर्थबोधपत्रिका' वर्गणीदारांसाठी विशेष योजना

| | |
|---|---|
| वार्षिक वर्गणी | २०० / - रुपये |
| द्वैवार्षिक वर्गणी | ३५०/ - रुपये |
| त्रैवार्षिक वर्गणी | ५००/ - रुपये |
| पंचवार्षिक वर्गणी | ८०० /- रुपये |

# *ग्रंथालयातील पुस्तके*

**Money and Banking**

Select Research Papers by the Economists of Reserve Bank of India, Edited by A. Vasudevan, Academic Foundation, New Delhi, 2003, pages - 285, Price - Rs. 795/-.

भारतीय रिझर्व्ह बँक आणि तिचे अध्वर्यू असणारे बँकेचे गव्हर्नर यांच्याबद्दल सर्वसामान्य मनुष्याच्या मनात नेहेमीच आदरयुक्त दरा-याची भावना वसत असते. देशाच्या पतधोरणाची शिल्पकार आणि देशातील बँकिंग क्षेत्राची सर्वेसर्वा या नात्याने बँकिंग क्षेत्राच्या विविधांगांवर रिझर्व्ह बँकेचे नियंत्रण असते, इतपतच तिच्याबद्दलची ढोबळ माहिती साधारणतः लोकांना असते. रिझर्व्ह बँक जी काही धोरणे सतत आखत-राबवत असते त्या धोरणांचा तपशील निश्चित करण्यासाठी तिला किती व्यापक प्रमाणावरील व सखोल संशोधन सतत हाती घ्यावे लागते, याची कल्पना मात्र बहुसंख्यांना नसतेच. किंबहुना, रिझर्व्ह बँकेमध्ये चालू असलेल्या संशोधनाचे अंतरंग सर्वसामान्य नागरिकाच्याच केवळ नव्हे तर, अगदी अव्वल संशोधकांच्याही कक्षेबाहेरच आजवर राहत आलेले आहे. प्रस्तुत ग्रंथामुळे ते संशोधन आता सर्व जिज्ञासू अभ्यासक व विद्यार्थ्यांना उपलब्ध होते आहे. पैशाच्या अर्थशास्त्रात पारंगत असलेल्या दिग्गज अर्थतज्ज्ञांनी रिझर्व्ह बँकेमध्ये आजवर सिद्ध केलेल्या संशोधनातील निवडक २० संशोधनपर लेखांचा अंतर्भाव या संग्रहात करण्यात आलेला आहे. बँकिंग, पतपुरवठा, पैशाचे अर्थशास्त्र यांसारख्या विविध प्रांतांतील गुंतागुंतीच्या संकल्पनात्मक बाबींचा उहापोह करणा-या संशोधकीय लेखांचे साक्षेपी संकलन, हे या ग्रंथाचे प्रधान वैशिष्ट्य. परकीय चलनाची गंगाजळी, देशाच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराचा तोल, महागाई यांसारख्या क्षेत्रांत वेळोवेळी उद्‌भवणा-या प्रश्नांना समर्पक तोडगे शोधण्याच्या दृष्टीने आपल्या देशातील पैसाधोरण आजवर कसकसे उत्क्रांत होत आलेले आहे, याचा मनोज्ञ आलेख इथे चितारलेला असल्याने या ग्रंथाच्या रूपाने सुजाण अभ्यासकांना मोठा ठेवाच जणू लाभलेला आहे.



RNI Regn.No. MAHMAR/2002/9806
Postal Regn.No.: PCW/115/2016-2018
Posted at Model Colony Post Office Pune, on 10th of each month

# भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ■‘इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी’ ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ■भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ■अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग -व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयांचे ज्ञान व माहिती देणे. ■इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य/पत्रके/ पुस्तिका प्रकाशित करणे.

**उपक्रम** ■संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक (‘जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी’) चालवले जाते.

■संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात.

■अलीकडे, संस्थेतर्फे सर्वसामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणा-या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

**- संस्थेचे नियंत्रण मंडळ -**

●विकास चित्रे ● किशोर चौकर ●सुरिंदर जोधका ●रमानाथ झा
●अभय टिळक ●रवींद्र ढोलकिया ●ललित देशपांडे ●दिलीप नाचणे
●सुहास पळशीकर ●मनोहर भिडे ●नीळकंठ रथ ●रूपा रेगे-नित्सुरे
●ए.वैद्यनाथन ●एस. श्रीरामन

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक व्ही. एस. चित्रे यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून ‘अर्थबोध’, ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : अभय टिळक**